महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९० वा | दिनांक : १७/०५/२०२५ | वार : शनिवार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शरद पवार एकाच मंचावर




**मुंबई :** येथील प्रसिद्ध वानखेडे स्टेडियम येथे नामकरण सोहळा पार पडला. यावेळी क्रिकेटपटू रोहित शर्मा तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नावाच्या स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. अजित वाडेकर यांच्याही नावाचे स्टँड यावेळी उभारण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शरद पवार एकाच मंचावर दिसून आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले, अतिशय ज्येष्ठ नेते ज्यांचे क्रिकेटमधील योगदान नेहमीच लक्षात राहील असे शरद पवार साहेब तसेच आपल्या बॅटिंगने मंत्रमुग्ध करणारे रोहित शर्मा, दिलीप वेंगसरकर, अजित वाडेकर यांचे कुटुंबीय आणि उपस्थित सर्व क्रिकेटप्रेमी भगिनी आणि बंधूंनो मी तुमच्या सर्वांचे स्वागत करतो. मी एमसीएने घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत करतो.

शरद पवार यांच्याबद्दल सांगण्याची आवश्यकताच नाही की भारतीय क्रिकेटच्या इतिहासात आणि क्रिकेटचे जे प्रशिक्षक असतील त्यांच्यात शरद पवार यांचे नाव नेहमीच आदरणीय राहील. बीसीसीआय असेल किंवा आयसीसी असेल यात शरद पवार यांचे योगदान फार मोठे आहे. त्यामुळे एमसीएने शरद पवार यांच्या नावाचे स्टँड उभारण्याचा जो निर्णय घेतला आहे याचे मी स्वागत करतो आणि अभिनंदन करतो, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

माझे मित्र अमोल काळे यांनी एमसीएमध्ये महत्त्वपूर्ण काम केले आहे. अमोल काळे यांना ईश्वराने अचानक नेले पण त्यांनी पाहिलेले स्वप्न एमसीए नक्कीच पूर्ण करेल. एमसीए लॉंजला त्यांचे नाव देण्यात आले आहे. तसेच रोहित शर्मा म्हणजे जे मैदानात आल्यावर मैदान दणाणून सोडतात. त्यांनी अशा दोन स्पर्धा जिंकवून दिल्या आहेत, ज्या आपल्या इच्छा अपूर्ण राहिल्या होत्या त्या त्यांनी पूर्ण करून दाखवल्या. त्यांचे मैदानात मोकळेपणे वागणे अशी त्यांची ओळख आहे. त्यांनी अतिशय लीलया या ठिकाणी कर्णधार म्हणून सगळ्या फॉरमॅटमध्ये अतिशय सुंदर आहे. आम्ही आता वाट पाहत आहोत की त्यांचा एक शॉट कधी रोहित शर्मा स्टँडला जाऊन लागतो याची आम्हा सर्वांनाच उत्सुकता असणार आहे. मला विश्वास आहे की यामुळे ते अधिक चांगले आणि अधिक काळ खेळतील.


खरे तर लोक पूर्वी असे म्हणायचे की लॉर्ड ही क्रिकेटची पंढरी आहे. परंतु खरी पंढरी ही वानखेडे आहे. पंढरी तिथे देव त्या अर्थाने वानखेडे येथे सचिन तेंडुलकरचा पुतळा आहे. वानखेडे पेक्षा मोठे स्टेडियम उभारण्याची जागा आम्ही उपलब्ध करून देऊ जिथे एक लाख प्रेक्षक बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे. चार वर्षांनी एमसीएला शंभर वर्ष पूर्ण होतील त्यावेळी अजून एक नवीन स्टेडियम उभारले जाईल, असा आपण प्रयत्न करू. या अतिशय सुंदर कार्यक्रमात तुम्ही मला बोलावले हा मी माझा सन्मान समजतो.

मी राज्यात क्रीडा मंत्री होतो तेव्हा जागा देण्यापासून ते स्टेडियम उभारण्यात अनेकजण सोबत होते. या स्टेडियमला एक इतिहास आहे. काही सहकाऱ्यांचे स्मरण होणे आवश्यक आहे. सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री यांचे योगदान नोंदणीय आहे, असे शरद पवार म्हणाले.

त्याच्या स्टँडचे उद्घाटन होण्यापूर्वी बोलताना रोहित म्हणाला की, तो खेळत असतानाही त्याला सन्मानित करण्यात आल्याने मी खूप आनंदी आहे.

रोहित शर्मा म्हणाला, सर्वप्रथम मी सर्वांचे आभार मानू इच्छितो, आमच्यासाठी हा एक खास दिवस आहे. आज जे घडणार आहे, त्याचे स्वप्न मी कधी पाहिले नव्हते. हे इतर कोणत्याही खेळाडूसारखे आहे ज्यांना त्यांचे सर्वोत्तम काम करायचे आहे, देशाची सेवा करायची आहे. मी अनेक टप्पे गाठले आहेत, पण असे काहीतरी खूप खास आहे. वानखेडे हे एक खास ठिकाण आहे, माझ्यासाठी खेळातील महान खेळाडूंमध्ये, जगातील सर्वोत्तम राजकीय नेत्यांमध्ये माझे नाव असणे, ही भावना मी व्यक्त करू शकत नाही.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ उद्धव ठाकरेंच्या भेटीला



**मुंबई :** आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षांमध्ये संवाद असणे महत्त्वाचे आहे. यासाठीच आज काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उद्धव ठाकरे यांची मातोश्री निवासस्थानी भेट घेतली. या भेटीनंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना आपल्या भेटी मागचे कारण सांगितले. महाराष्ट्र धर्म वाचवण्यासाठी दोन्ही पक्षांमध्ये समन्वय असणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.

काही दिवसांपूर्वीच हर्षवर्धन सपकाळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांची देखील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती. त्यानंतर आता उद्धव ठाकरे यांची देखील त्यांनी भेट घेतली आहे. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महा विकास आघाडी एकत्र लढण्याबाबत चर्चा सुरू असताना हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतलेल्या या भेटी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. या भेटीत सकारात्मक चर्चा झाली असल्याचे संकेत देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिले आहेत.

महाराष्ट्र धर्म जगला तरच देश जागेल, ही आपल्या महाराष्ट्र धर्माची खासियत असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. या वेळी सपकाळ म्हणाले की, आज याच विचारांवर फार मोठे संकट भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आलेले आहे. ही संघर्षाची वेळ आहे. या विरोधामध्ये जोरकस प्रयत्न करत असताना संघर्ष आणि लढा करणे आवश्यक आहे. या लढ्यामध्ये दोन्ही पक्ष महाराष्ट्र धर्म वाचवण्यासाठी आगामी काळात सोबत कसे राहतील, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक संवाद स्थापित करणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर आज उद्धव ठाकरे यांची भेट घेतली असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

## बालवाङ्मय वाचण्याचे माझे वय राहिले नाही : देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** कथा, कादंबऱ्या किंवा बालवाङ्मय वाचण्याचे माझे वय नसल्याची सडेतोड प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांच्या 'नरकातला स्वर्ग' या पुस्तकाविषयी दिली आहे. या पुस्तकाचे उद्या प्रकाशन होणार आहे. या पुस्तकामध्ये संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबाबत मोठे दावे केल्याचे सांगितले जात आहे. यामध्ये नरेंद्र मोदी यांना वाचवण्यासाठी बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांनी मदत केली असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कथा कादंबऱ्या आणि बालवाङ्मय वाचायचे माझे वय राहिले नाही. त्यामुळे अशा गोष्टी मी वाचत नाही. संजय राऊत कोण आहेत? ते खूप मोठे नेते आहेत का? असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांच्या पुस्तकांमध्ये करण्यात आलेल्या दाव्यावर प्रतिक्रिया दिली आहे.

संजय राऊत यांच्या पुस्तकामध्ये 'राजा का संदेश साफ है' या नावाचे प्रकरण लिहिलेले असल्याची माहिती आता समोर आली आहे. आजपर्यंत कधीही समोर न आलेले अनेक खळबळजनक दावे यामध्ये करण्यात आले आहेत. यामध्ये स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी तत्कालीन गुजरातचे आमदार अमित शहा यांच्यावर मोठे उपकार केले असल्याची संपूर्ण माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे.

गुजरात दंगल प्रकरणात सीबीआयचा ससेमिरा अमित शहा यांच्या मागे लागला होता. त्यावेळी त्यांना तडीपार देखील करण्यात आले होते. ही तडीपारी दूर करण्यासाठी अमित शहा हे मातोश्री दरबारी आले होते. त्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांनी एक फोन करून अमित शहा यांना या संकटातून कसे बाहेर काढले, याची माहिती देणारा दावा देखील या पुस्तकात करण्यात आला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ मे २०२५

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

## प्रा. डॉ. सतीश मस्के यांना काकासाहेब बैसाणे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



**पिंपळनेर :** येथील कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.सतीश मस्के यांना साहित्य व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल 'काकासाहेब बैसाणे जीवन गौरव पुरस्कार ' शिरपूर जि.धुळे येथील हॉटेल सिटी प्राईड उत्सव च्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात किसान विद्या प्रसारक संस्थेच्या खजिनदार व कार्यक्रमाचे अध्यक्षा आशाताई रंधे, किसान विद्या प्रसारक संस्थेचे सचिव निशांतजी रंधे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी विचार मंचावर काकासाहेब बैसाणे यांच्या पत्नी आशाताई बैसाणे, साहित्यिक डॉ.माधव कदम, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी जी.के.मंगळे, अथर्व पब्लिकेशनचे युवराज माळी, आयोजक डॉ.तुषार बैसाणे, संदीप बैसाणे व पनीराज बैसाणे, डॉ.आशा सोसे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. काकासाहेब खंडू कडू बैसाणे यांच्या पाचव्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन सभा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्या कार्यक्रमातच या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. प्रा.डॉ.सतीश मस्के यांना या अगोदर शैक्षणिक , सामाजिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पाच वेळा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे खान्देशातील आंबेडकरी चळवळ खंड १,२,३ त्याचबरोबर आंबेडकरी योध्दा (गौरवग्रंथ), हंबरडा (कथासंग्रह), दाटुन आलेल्या कळा (कवितासंग्रह), माणुसकीचा गहिवर (ललित लेखसंग्रह) असे सात ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्याचबरोबर त्यांनी विविध साहित्य संमेलनाच्या परिसंवादात, चर्चासत्रात,कवी संमेलनात सहभाग नोंदवला असुन त्यांचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विद्यापीठ स्तरीय पातळीवर शोधनिबंधही प्रकाशित झालेले आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ.एल.बी.पवार व मित्र परिवाराकडुन त्यांचे अभिनंदन होत आहे.

प्रा. डॉ. सतीश मस्के यांना काकासाहेब बैसाणे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना किसान विद्या प्रसारक संस्थेच्या खजिनदार आशाताई रंधे, किसान विद्या प्रसारक संस्थेचे सचिव निशांत रंधे, आशाताई बैसाणे, डॉ.माधव कदम, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी जी.के.मंगळे आदी उपस्थित होते.

## कष्ट, जिद्द आणि चिकाटी हाच तुमच्या यशाचा पासवर्ड आहे डॉ.अ.करीम सालार




**जळगाव :** इकरा पब्लिक हायस्कूलने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत यंदाही उत्कृष्ट निकालाची वैभवशाली परंपरा कायम राखली आहे.

शाळेचा सेमी इंग्रजीचा निकाल ९७.९५ टक्के लागला आहे.यात प्रथम सैय्यद शाहीद मोहसीन(८९.२० टक्के), द्वितीय शेख साद अलाउद्दीन (८६.८० टक्के),व अरशद अलताफ पटेल (८६.८० टक्के) तृतीय शहजाद अख्तर खान (८६.०० टक्के),चौथा क्रमांक शेख साईम अझरुद्दीन (८३.२० टक्के), पाचवा क्रमांक अरसलान बिस्मिल्ला खान (८२.४० टक्के),मिळून यशस्वी झालेले आहे.

संस्थेचे अध्यक्ष अ.करीम सालार, उपाध्यक्ष डॉ.इकबाल शाह, सचिव एजाज मलिक, प्रो.शेख जफर, अब्दुल रशीद शेख,इरफान सालार,शाळेचे मुख्याध्यापक शेख शकील व वर्ग शिक्षक मोहसीन खान व सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देवून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत कौतुकाची थाप दिली.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ मे २०२५

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने शतकोत्तर ११० व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन


**छत्रपती संभाजीनगर :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज जीवनात मानवतावादाची पाळेमुळे खोलवर रुजविण्यासाठी ते समजून, समजावून घेता यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या प्रमाणात लिखाण करून ठेवलेले आहे.

त्या आंदोलनाचा कारवाँ वेगाने पुढे घेऊन जाण्यासाठी चळवळीची एकंदर स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. करिता "बहुजन चळवळ काल, आज आणि उद्या." या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ११० व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे दिनांक १७ मे २०२५, शनिवारला दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपण सर्व मानवतावादी विचारांच्या व्यक्तींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे नागसेन विद्यालय, पीरबाजार, उस्मानपुरा, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या संचालिका : मा. सूर्यकांता गाडे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत.

तर प्रमुख वक्ते म्हणून माजी समाज कल्याण सभापती मा. मारुती साळवे हे मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक मा. बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता ११० व्या शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ मे २०२५

# बीड, नांदेड, संभाजीनगरमध्ये 'सीट्रीपलआयटी'ना मंजुरी



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांच्याच पुढाकारामुळे बीड जिल्ह्यानंतर आता नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इक्युबेशन अॅन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रीपलआयटी' मंजूर करण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पाठविलेल्या पत्राला कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून नांदेड आणि छत्रपती संभाजी नगरसाठी दोन प्रशिक्षण केंद्रे मंजूर केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. अजित पवार यांनी घोषणा केल्यानंतर अवघ्या दीड महिन्यात मराठवाड्यातील बीड, नांदेड, संभाजीनगर या तीन जिल्ह्यांसाठी तीन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रयत्न आणि टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने महिन्यापूर्वी बीडसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाले आहे. त्यानंतर आता नांदेड व छत्रपती संभाजी नगरसाठी दोन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने, मराठवाड्यातील युवकांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण, उद्योगक्षेत्राला कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यात नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची यानिमित्ताने पूर्ती होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याचा विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांचे सातत्याने मराठवाडा दौरे सुरु आहेत. दि. २३ मार्च २०२५ रोजीच्या मराठवाडा दौऱ्यात नांदेड येथे बोलताना त्यांनी बीड, नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथे 'सीट्रीपल आयटी' उभारण्याची घोषणा केली होती. दौऱ्यावरुन मुंबईत परतल्यानंतर दि. २५ मार्च २०२५ रोजी तात्काळ टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून या तीन जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. कंपनीने दीड महिन्यात तिन्ही जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपल आयटी' मंजूर केल्याची पत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या 'सीट्रीपल आयटी'मुळे मराठवाड्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, 'एआय' वापरासह तांत्रिक कौशल्यविकासाची संधी मिळेल.युवकांना उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात 'सीट्रीपलआयटी' महत्वाची भूमिका बजावणार आहेत.

'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविलेल्या पत्रात, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी प्रत्येकी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीट्रिपलआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे कळविले आहे. यापैकी १६२ कोटी ६२ लाख रुपये टाटा टेक्नॉलॉजी तर, उर्वरीत रक्कम राज्य शासन आणि संबंधित जिल्हा प्रशासन देणार आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून मराठवाड्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीट्रिपलआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी प्रत्येकी ७ हजार प्रमाणे मराठवाड्यातील २१ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

मराठवाड्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण

'सीट्रीपलआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षण खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून करणार आहेत. यामुळे नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बीड जिल्ह्यांसह मराठवाड्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल मराठवाड्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

## यशवंत बँकेत १५० कोटींचा घोटाळा प्रकरण

**फलटण :** येथील यशवंत बँकेचा १५० कोटी पेक्षा अधिक रुपयांचा घोटाळा झाला आहे.यात बँकेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांचा प्रमुख समावेश आहे. त्यांनी वेगवेगळ्या बोगस कंपन्यांमार्फत कराड येथील अनेक लोकांची फसवणूक केलेली आहे आणि जणांच्या नावावर बोगस कर्ज काढलेली आहे, कर्ज प्रकरण केलेली आहेत, सदरचे कर्ज थकीत आहेत. सदर कर्जाचे पैसे हस्ते परहस्ते बोगस कंपन्यांमध्ये वळवलेले आहे.

सर्व आर्थिक व्यवहारांमध्ये स्वतःचा व कुटुंबाचा फायदा केला आहे .त्याचप्रमाणे बँकेमधील पैशाचा विनियोग स्वतःच्या खासगी मालमत्ता घेण्यासाठी केला असल्याने त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करून सीबीआय चौकशी करावी, अशी मागणी खासदार मेधा कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. यावेळी फसवणूक झालेले बँकेचे ठेवीदार व कर्जदार यांच्यासह नीलेश जाधव, गणेश पवार, एस डी कुलकर्णी उपस्थित होते. या वेळी कुलकर्णी म्हणाल्या की, यशवंत सहकार बँकेचे अनेक ठेवीदार यांच्याशी मी बोलणे केले. लोकांनी ज्या ठेवी बँकेत ठेवले होत्या ते मिळणे अशक्य झाले आहे.

सदर रक्कम पाच लाखांच्या आत आहे दबाव ठेवीदार यांच्यावर टाकला जात आहे. माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, कर्ज बुडीत यांच्या सोबत जाऊन मी त्यांची चुकीची बाजू घेत असल्याचा आरोप केला. परंतु बँक अध्यक्ष यांनी स्वतः पदाचा दुरुपयोग करून खोटी कर्ज प्रकरणे करून बँकेचे मोठे आर्थिक नुकसान केल्याने कर्ज बुडीत झाली आहे. 127 कोटी रुपये कर्ज ही केवळ शेखर चरेगावकर यांच्या आणि नातेवाईक यांच्या नावाने आहे. स्वतःच्या बँकेतून कर्ज घेऊन फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. त्यामुळे त्यांनी माझ्या नावावर कोणते कर्ज नाही सांगणे बिनबुडाचे आहे.

ठेवीदार यांचे पैसे बँक देऊ शकत नसल्याने ती बुडीत दाखवून आरबीआय कडून केवळ पाच लाख रुपये ठेवीदार यांना देण्याचे आश्वासन देऊन ग्राहक आणि शासन यांची फसवणूक करण्यात येत आहे. कोणताही कागदपत्रांची शहानिशा न करता कर्ज वाटप झाल्याने बँकेचे अध्यक्ष आणि संचालक यांनी मोठा घोटाळा केला असून याची सीबीआय चौकशी करण्यात यावी. बँकेवर प्रशासक नेमण्यात यावा. चुकीचे व्यक्ती नावे कर्ज घेतल्याने बँकेचे अध्यक्ष आणि संचालक यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.